माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ११४९/२०२२**

**अपिलार्थी, श्री. झनकलाल सहेसराम बिसेन**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी,**
पंचायत समिती, गोरेगांव ता. गोरेगांव जि. गोंदिया

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
पंचायत समिती, गोरेगांव ता. गोरेगांव जि. गोंदिया

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर *नागपूर*

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०७.२०२४**

| | | |
|---|---|---|
| **अपीलकर्ता** | : | **उपस्थित** |
| **जन माहिती अधिकारी** | : | **उपस्थित** |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | **उपस्थित** |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १८.११.२०२१ | १४.१२.२०२१ | २४.१२.२०२१ | १४.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १८.११.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " दिनांक २०.१०.२०२१ ते माहिती मिळेपर्यंत, अर्जदाराने दिनांक २०.१०.२०२१ ला केलेल्या तक्रारीवर पंचायत समिती कार्यालय गोरेगांव द्वारे केलेल्या चौकशी अहवाल, त्या अनुषंगाने, अर्जदाराशी केलेला पत्रव्यवहार, त्या संबधाने घेण्यात आलेले बयाण, चौकशीकरीता नेमलेल्या अधिकाऱ्याचे नाव, हुद्दा, आदेशपत्र, केलेली दैनंदिन टिप्पनी अहवाल, चौकशी न केली असल्यास त्या संबंधाने आदेश, परीपत्रक व संबंधीत संपूर्ण कागदपत्रांची सत्यप्रतीत माहिती देण्यात यावी " याबाबत माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहिती मागण्याच्या अर्जानुसार कलम ७(१) मधील तरतुदींनुसार या कार्यालयास उपलब्ध असुन, आपण व्यक्तीश: माहितीची मागणी केलेली असल्याने आपणांस विनंती करण्यात येते की, कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून माहिती प्राप्त करुन घ्यावी, त्यानुसार अपिलार्थीस ४ पृष्ठाची माहिती पोस्टान पाठविण्यात आली आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी

**दिनांक २४.१२.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " मागितलेली माहिती आजपर्यंत पुरविण्यात आलेली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४.०१.२०२२ रोजी सुनावणी घेवून, श्री. सी.सी. हरिणखेडे विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, गोरेगाव यांनी अपिलार्थीने जोडपत्र अ मध्ये नमुद केलेल्या दिनांक २०.१०.२०२१ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने, चौकशी करुन चौकशी अहवालाची प्रत व इतर कागदपत्राच्या प्रती अपिलार्थीस १५ दिवसाचे आत निशुल्क पुरविण्याची कार्यवाही करुन तसा अहवाल करण्याची कार्यवाही करावी, असे आदेशीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २७.०४.२०२२ रोजी** " जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र अ नुसार मागितलेली माहिती अपुर्ण दिलेली आहे, दिलेली माहिती प्रमाणीत करुन दिलेली नाही. तसेच कलम २०(२) नुसार जन माहिती अधिकारी यांना शास्ती व दंड आकारण्यात यावा " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक ०९.०७.२०२४ रोजी ऑनलाईन सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी श्री. संजय बनकर उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी श्री. शूभम जाधव ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी स्तरावर योग्य ती माहिती विहित मुदतीत प्रदान न केल्यामुळे प्रस्तुत प्रथम अपील अर्ज दिनांक २४.१२.२०२१ रोजी दाखल करण्यात आला. वरील अर्जाच्या सुनावणी दरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.१२.२०२१ रोजी ४ पानांची माहिती कार्यालयात पोष्टाने पाठविण्यात आले असल्याचे नमुद केले. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी, असे नमूद केले की, कराची मागणी पावती व नमुना ८ ची मागणी केलेली नाही, तरी ती पुरविण्यात आली. मात्र केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाहीचा अहवाल पुरविण्यात आला. त्यामुळे अपिलार्थी यांचा प्रथम अपील अर्ज मान्य करीत, अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गोरेगांव यांनी श्री. बिसेन यांच्या जोडपत्र अ मध्ये नमुद दिनांक २०.१०.२०२१ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने, चौकशी करुन चौकशी अहवालाची प्रत व इतर कागदपत्रांच्या प्रती १५ दिवसाचे आत निशुल्क



महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

देण्याचे निर्देश दिलेले आढळुन येतात. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपुर्ण माहिती दिली असल्याचा आक्षेप नोंदवित दिनांक २७.०४.२०२२ रोजी प्रस्तुत द्वितीय अर्ज दाखल करण्यात आला.

आज झालेल्या सुनावणीत अपिलार्थी यांना केवळ ४ पृष्ठांची माहिती मिळाली असल्याचा पुनरुच्चार केला असुन, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना दिनांक ०४.०२.२०२२ रोजी जावक क्रमांक २६७/२०२२ अन्वये तब्बल ११ पृष्ठांची माहिती देण्यात आली असुन, त्यात मोबाईल टॉवर संदर्भात शासनाने जारी केलेले दिशानिर्देश, परिपत्रक त्या अनुषंगाने, पंचायत समिती द्वारा करण्यात आलेली कार्यवाही याबाबत कार्यालयीन अभिलेखात कलम २ (च) नुसार उपलब्ध असलेले दस्ताऐवज विनामुल्य देण्यात आले असल्याचे नमुद केलेले आहे. अपिलार्थी यांना माहिती मिळाली नसल्याचे वरील प्रतिपादन लक्षात घेता, उपरोक्त ११ पृष्ठांची पुनश्च एकदा अपिलार्थी यांना माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या शिक्यासह माहिती अधिकाराच्या लोगोसह विनामुल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढुन नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**आदेश**

**द्वितीय अपील नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०९.०७.२०२४**

जावक क्रमांक ६९७५ दिनांक 24 SEP 2024